## नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२

## नि. ८७ खालील आदेश

०१. अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे वाचले. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस्.जी. पणदुरकर व वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर अेस्. गव्हाणकर यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज हा प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५ नुसार दाव्यात जादा मुद्दे काढण्यासाठी दिलेला आहे.

०२. दावा पाहिला. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरूध्द दावा मिळकत म्हणजेच प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या मालकीच्या असलेल्या मौजे सावंतवाडी येथील भूमापन क्र. ११० हि.क्र १२ क्षेत्र ०.०५.० हे.आर. या मिळकतीत असलेला सावंतवाडी नगर परिषद इमला क्र. बी—२१८अ हा वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या वडीलांच्या कब्जातील व मालकीचा इमला असल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर त्या इमल्याचे वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यामध्ये वाटप होवून मिळण्यासाठी व त्या इमल्यात वादीचा असलेल्या निम्म्या हिश्याचा कब्जा वादीला मिळावा यासाठी दावा दाखल केला आहे. दाव्यात वादीचा पुरावा होवून प्रतिवादी क्र.१ चा सुध्दा पुरावा झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ ने सदरचा अर्ज दिलेला आहे.

०३. प्रतिवादीचे अर्जातील कथनानुसार दाव्यात आवश्यक पक्षकार सामील केले नाहीत असा मुद्दा काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी मागणी केली आहे. प्रतिवादीने कैफियतीमध्ये वादी, प्रतिवादीला जनार्दन नांवाचा भाऊ असून सुप्रिया, दुर्गा, मालिनी व नलिनी या चार बहिणी आहेत. तसेच त्यांचा भाऊ रमाकांत यांस रमाबाई हि विधवा पत्नी आहे व त्यांना दाव्यात सामिल केल्याशिवाय दावा कायदयाने चालणारा नाही अशी हरकत घेतलेली आहे. सदरचा दावा हा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. तसेच दाव्यात वादीच्या वडीलांनी बक्षिसपत्राने दावा मिळकत वादी व प्रतिवादीला निम्मे निम्मे दिलेली आहे असे कथन केलेले आहे. परंतु ते प्रतिवादीने नाकारलेले आहे. सदरचा दावा वाटपाचा असल्यामुळे महादेव गिरी यांचे सर्व वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. परंतु वादीने महादेव गिरी यांच्या सर्व वारसांना दाव्यात सामील केलेले नाही. त्यामुळे दाव्यात ‘‘आवश्यक पक्षकारांना सामील केले नाही याची बाधा येते का ?’’ असा मुद्दा असणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

०४. प्रतिवादींनी अर्जात दाव्याला ‘‘पुर्वन्याय’’ या तत्वाची बाधा येतो का ? असा मुद्दा काढणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे. प्रतिवादीने त्याच्या कैफियतीत या वादीने प्रतिवादीविरूध्द यापुर्वी रे. दि.मु.क्र. १२९/१९९० हा दावा वाटपासाठी दाखल केला होता व तो रद्दबातल केलेला आहे असे नमुद केलले आहे. या वादीने या प्रतिवादीविरूध्द यापूर्वी अशाच

स्वरूपाचा दावा दाखल केला अशी हरकत घेतल्यामुळे दाव्यात या दाव्यास ''पूर्वन्याय'' या तत्वाची बाध येते का ? असा मुददा काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते

०५. प्रतिवादींनी अर्जात प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या मालकीची दावा मिळकत असल्याचे वादीनेच नमुद केलेले असल्यामुळे व ते महाराष्ट्र विश्वस्त संस्था अधिनियम अंतर्गत स्थापन झालेले संस्थान असल्यामुळे त्यांना दाव्यात सामील करण्यासाआधी मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार कोणतीही परवानगी घेतली नव्हती व त्यामुळे दावा मिळकतीचे वाटप करता येणार नाही व त्यासाठी सदरचा दावा वाटपास पात्र आहे का ? असा मुददा काढण्याची मागणी केलेली आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या कैफियतीत तशी हरकत घेतलेली आहे. परंतु दाव्यातील मुद्दे पहाता मुद्दा क्र. २ यामध्ये दावा इमल्याचे धडेवाटप होवून मिळण्यास वादी पात्र आहेत का ? असा मुददा काढलेला आहे. सदर मुददयामध्येच दावा मिळकत वाटपास पात्र आहे की नाही हा मुददा सुध्दा अंतर्भूत होतो असे माझे मत आहे. त्यामुळे प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे पुन्हा त्याच अनुषंगाचा मुद्दा काढण्याची कोणती आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही.

०६. सबब वरील बाबींचा विचार करता अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर केला

२. दाव्यात मुददा क्र. ३ म्हणून ''दाव्यास आवश्यक पक्षकार सामील केले नाही याची बाधा येते का ? व मुददा क्र. ४ म्हणून ''दाव्याला ''पूर्वन्याय'' या तत्वाची बाधा येतो का ? असे जादा मुद्दे काढण्यात येत आहे.

३. वादी, प्रतिवादींना सदर मुद्दयाबाबत पुरावा दयायचा असल्यास त्यांना तशी मुभा देण्यात येत आहे.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

सही/—
दिनांक :— ३०/१०/२०१७
(म. सु. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.